पुढारी

# विद्यापीठाच्या भिंती सांगणार 'कोल्हापूर संस्कृती'

- ▶ संरक्षक भिंतीवर रेखाटली जाणार ऐतिहासिक कला, संस्कृतीची चित्रे
- ▶ पर्यावरण संवर्धनाच्या संदेशांचा मजकूर
- ▶ २ किलोमीटर भिंतीवरील चित्रे पर्यटकांसाठी आकर्षण

**कोल्हापूर : विजय पाटील**

संरक्षक भिंत म्हणजे तसा दुर्लक्षित विषय, पण शिवाजी विद्यापीठाच्या लांबलचक संरक्षक भिंती आता कोल्हापूरच्या संस्कृतीचे महत्त्व सांगणार आहेत. कारण जुन्या पुणे-बंगळूर रोडवरील विद्यापीठाच्या दोन्ही बाजूच्या २ किलोमीटर अंतरांच्या भिंतींवर शहर सौंदर्यकरणाचा भाग म्हणून कोल्हापूरची संस्कृती रेखाटली जाणार आहे. या निर्जीव भिंती यानिमित्ताने बोलू लागणार आहेत. कोल्हापूरचे ऐतिहासिक महत्त्व, कला व संस्कृतीची प्रतिके तसेच क्रीडा संस्कृतीचा ठेवा आदी चित्रे या भिंतीवर रेखाटली जाणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाचा परिसर जवळपास साडेआठशे एकर इतका विस्तीर्ण आहे. हा परिसर निसर्गसौंदर्याने नटलेला आहे. विद्यापीठाची मुख्य इमारत अत्यंत देखणी आणि आकर्षक आहे. विद्यापीठाच्या विस्तीर्ण परिसराच्या संरक्षणासाठी लांबलचक संरक्षक भिंत एखाद्या खड्या सैनिकाप्रमाणे बांधण्यात आली आहे, पण इतर भिंतीसारखीच ही रंग नसलेली भिंत आहे, पण विद्यापीठाच्या वतीने या भिंतींचा वापर कल्पक पद्धतीने केला जाणार आहे. कारण या भिंतीवर कोल्हापूरची संस्कृती दाखवणारी चित्रे रेखाटली जाणार आहेत.

या कल्पक उपक्रमाला साचेबद्धपणा येऊ नये यासाठी विद्यार्थी, नागरिक, कलाकार तसेच इच्छुक संस्थाकडून याबाबतची संकल्पना असणारे प्रस्ताव मागवण्यात आले आहेत. या प्रस्तावामधून निवड केल्यानंतर ही संकल्पना तत्काळ राबवली जाणार असल्याचे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले..

> "कोल्हापुरात प्रवेश करताना सुरुवातीलाच शिवाजी विद्यापीठाचा परिसर लागतो. कोल्हापूर हे सर्वच बाजूंनी समृद्ध शहर आहे. विद्यापीठाला २ कि.मी. इतक्या मोठ्या अंतराची संरक्षक भिंत आहे. या भिंती तशा रुक्ष वाटतात. पर्यटकांना कोल्हापूरचे महत्त्व चित्रांतून कळावे तसेच या कलानगरीत त्यांचे कलाविष्काराने स्वागत व्हावे, या उद्देशाने या भिंतींवर विविध चित्रे रेखाटली जाणार आहेत.
>
> **– डॉ. डी. टी. शिर्के** (प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ)

## भव्य चित्रांचे नियोजन

*ऐतिहासिक, कला, क्रीडा, संस्कृती, पर्यटन आदींचे वर्गीकरण करून ३० फूट बाय ६ फूट इतक्या मोठ्या भिंतींच्या आकारावर एक वर्गीकरण केलेल्या विषयांच्या चित्रांचे रेखाटन करण्याचे सध्याचे नियोजन आहे. त्यामुळे भिंतीचा आकार पहाता समृद्ध संस्कृतीची पाने या भिंतीच्या माध्यमातून उलगडणार आहेत..*



विद्यापीठातून...

**पर्यटकांचे आकर्षण**

कोल्हापूरची गुणवैशिष्टे पर्यटकांना वाहनांतून जाताना सहज दिसावीत, असे नियोजन या उपक्रमात समाविष्ट आहे. त्यामुळे कोल्हापूरला भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी या भिंती आकर्षणाचा विषय असणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 OCT 2018
Times of India

# SUK asked to provide data on management info system

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Directorate of Higher Education (DHE) has asked the Shivaji University, Kolhapur (SUK) to submit the Management Information System (MIS) data of the 2018-19 academic year of its affiliated colleges by December 31.

In a circular dated September 27, Dhanraj Mane, director, higher education, said that all affiliated colleges should submit their information to the university by December 31, and the university shall scrutinize the data by January 31, 2019. The final data has to be submitted to the DHE by February 5, 2019, he added.

According to the university officials, to make the information submission procedure simpler, the university generally conducts a workshop related to updating information on the MIS portal. "Colleges will have to submit the information on *www.dhemis.maharashtra.gov.in*. Colleges can contact 0231-2609147 to clear any doubts," stated the university circular.

The MIS data is collected on several parameters such as teachers, student enrolment, programmes, examination results, education finance and infrastructure among others.

According to the university officials, the details are important, as the information is used to formulate policies on creating skilled manpower development in the higher education sector in the country.

"The information submitted needs to be accurate in terms of facts and figures so as to avoid any unnecessary mistakes. The information is generally used in the informed policymaking by the minister and hence colleges need to be extra careful while submitting the data," a university official said.

Notably, the SUK has as many as 293 affiliated colleges across the Sangli, Satara and Kolhapur districts, with more than three lakh students studying for various under-graduate and post-graduate courses under the university.

The DHE of the state government had awarded the university with an appreciation letter for its outstanding contribution in the MIS in the last few years.

File Photo



The final data has to be submitted to the Directorate of Higher Education by February 5, 2019

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 OCT 2018
तरुण भारत

# डी. बी. पाटील यांना विद्यापीठाची डी. लिट. मिळावी

## कोल्हापूर जिल्हा शैक्षणिक व्यासपीठाच्या सभेत मागणी

वार्ताहर
पुलाची शिरोली

कोल्हापूर जिल्हा शैक्षणिक व्यासपीठच्या वतीने शैक्षणिक क्षेत्रातील विविध समस्या व प्रश्नांची चर्चा करण्यासाठी सभा आयोजित केली होती. या सभेत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील यांना शिवाजी विद्यापिठाची डी.लिट. पदवी मिळावी अशी मागणी करण्यात आली.

प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डींगमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक महाविद्यालयीन शिक्षण विभागातील विविध समस्यां व प्रश्नांची चर्चा करण्यासाठी विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची सभा आयोजित केली होती. प्रास्ताविक शैक्षणिक व्यासपीठ अध्यक्ष एस. डी. लाड यांनी केले. प्रमुख उपस्थिती जेष्ठ शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील यांची होती. अध्यक्षस्थानी डॉ. क्रांतीकुमार पाटील होते.

संस्थाचालकांचा तालुकानिहाय बैठका, पवित्र पोर्टल मार्फत शिक्षक भरती शासन कार्यवाही विरोध, शिक्षक भरती बंदी उठवून शिक्षक भरतीचे अधिकार संस्थेस द्यावे, अतिरिक्त शिक्षकांचे प्रश्न, संच मान्यतेच्या त्रुटी दूर करणे, ऑनलाईन भरतीमुळे अध्यापन सोडून काम करावे लागते. शासनाने ऑनलाईन माहितीसाठी वेगळी यंत्रणा सुरू करावी, बीएलओचे काम बंद करावे, शासनाच्या काही चुकीचे धोरण विरोध आदी विषयांवर चर्चा झाली.

या प्रसंगी वसंतराव देशमुख, जयंत आसगावकर, व्ही.जी. पवार, आर. वाय. पाटील, सुधाकर निर्मळे, सी. एम. गायकवाड, मिलींद बारवडे, आर. डी. पाटील, प्राचार्य सी. आर. गोडसे, गजानन जाथव, बी.जी. बोराडे, सुधाकर सावंत, के. के. पाटील, उदय पाटील, राजेश वरक, अरूण मुजमदार, डी. ए. जाधव, रंगराव तोरस्कर, समीर घोरपडे, संदीप पाटील, आदी उपस्थित होते. आभार सी. एम. गायकवाड यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 OCT 2018
पुण्यनगरी

# रोजगार क्षमता वृद्धी कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा केंद्रीय रोजगार कक्ष व आयटीएम स्कील ॲकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने रोजगार क्षमता वृद्धीसाठीची कार्यशाळा उत्साहात पार पडली. शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभागांच्या आणि संलग्नित महाविद्यालयांचे प्राध्यापक व प्लेसमेंट अधिकारी यांना मार्गदर्शन करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी आयटीएम स्कील ॲकॅडमीच्या चित्रा कंपानी प्रमुख पाहुण्या होत्या. यावेळी डॉ. ए. एम. गुरव, एच. एम. ठकार, गंधाली खर्गे, जी. एस. राशिनकर, सोमनाथ पवार यांची उपस्थिती होती.

# विद्यापीठात विविध कौशल्यांबाबत मार्गदर्शन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा केंद्रीय रोजगार कक्ष आणि आय. टी. एम. स्कील अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने रोजगार क्षमता वृद्धीसाठीचा कार्यक्रम शनिवारी घेण्यात आला. या कार्यक्रमात आय. टी. एम. स्कील अकॅडमीच्या चित्रा कंपानी, विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन शाखेच्या अधिष्ठाता प्रा. डॉ. ए. एम. गुरव, एमबीए अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. एच. एम. ठकार यांनी मार्गदर्शन केले.